जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.११/०८/२०२३
## दि.१०/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ८२१/२०२३,भादविक २७९,३३७,३३८,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट१८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | विनोद चौटे,वय ४८ वर्षे रा. धनकवडी पुणे |
| **आरोपीत** | सिमेंट पाईप ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०८/२०२३ रोजी स.०८/४५ वा.चे दरम्यान कोंढवा बुद्रुक स्मशान भुमी,टिळेकर जनसंपर्क कार्यालया समोरील बस स्टॉप जवळ कात्रज-कोंढवा रोडवर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे भाऊ प्रशांत कृष्णा चौटे,वय-४५ वर्षे रा.सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स, प्रियदर्शिनी शाळेच्या पाठीमागे धनकवडी,पुणे हे पायी जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील सिमेंट पाईप वाहतुक करणारा ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी प्रशांत चौटे यास पाठीमागुन जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,रोडवरील इतर काही दहा ते बारा चार-चाकी व दुचाकी वाहनांना धडक देवुन,त्यांचे नुकसान करुन,इसम नामे १) प्रमोद शिळीमकर २)राधीका बैंधे ३)सुभाष पांडागळे ४)विराज पाटील ५)शुभ रावत ६)नारायण काटकर ७)रवि बराथे यांना जखमी केले असुन,त्यांचेवर खासगी व इतर हॉस्पीटल मध्ये उपचार चालु आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चव्हाण ९०२१६४७४०७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४२८/२०२३,भादविक ४५२,३२३,५०४,५०६(२),४२७,३४,महा.पो.का.क.३७(१) १३५, आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | शेहनाज शेख,वय ४६ वर्षे रा.विमाननगर,पुणे |
| **आरोपीत** | १.प्रसाद संपत गायकवाड,वय २५ वर्षे,रा.महादेवनगर खराडी रस्ता,वडगाव-शेरी,पुणे २.अरबाज आयुब पटेल,वय २४ वर्षे,रा.सर्व्हे नं.१९१,नागपुर चाळ,येरवडा,पुणे (अटक) व इतर दोन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/०८/२०२३ रोजी रात्री २३/१५ वा.स.नं.२३०,विमानदर्शन फ्लॅट नं.३१८,संजय पार्क, विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे घरी असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे घरा मध्ये जबरदस्तीने घुसुन,तुमचा भाचा कोठे आहे,त्याला आज सोडणार नाही असे म्हणुन,घरातील लोकांना शिवीगाळ करून,त्यांना धक्का-बुक्की करुन,फिर्यादी यांचा मुलगा शाहरुख यास हाताने मारहाण केली. तसेच फिर्यादी यांचेवर धारधार हत्यार उगारुन आमचे मध्ये येवु नका, नाहीतर तुम्हाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. त्यानंतर जाताना फिर्यादी यांचे घरा समोर पार्क केलेल्या वाहनांची तोडफोड करुन,आजुबाजुचे परिसरामध्ये दहशत पसरवुन घरातील इतर साहित्यांची तोडफोड करून वाहनाचे व इतर साहित्याचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्ही.एम.चंदन ८२७५५२२६९७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ६४९/२०२३,भादविक ४२७,सह भारतीय विद्युत अधिनियम कलम १३६ प्रमाणे. |
| **फिर्यादी** | मोहन वरघट,वय ४२ वर्षे,रा.उरुळी-कांचन,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/०८/२०२३ रोजी रात्री २०/०० वा. ते दिनांक १०/०८/२०२३ रोजी १०/०० वा. चे दरम्यान टकले वस्ती,गट नं.२७/१ हिंगणगाव ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,टकले वस्ती,गट नं.२७/१ हिंगणगाव ता.हवेली जि.पुणे येथे असलेल्या ट्रान्सफॉर्मर मधील ऑईल सांडुन १०,०००/- रुपयांचे नुकसान करुन,तसेच ८० किलो वजनाच्या तांब्याच्या तारा कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेल्या आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, साळुंके ९०११३४३०१० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १६८/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ७५ वर्षे रा.कोथरुड पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०८/२०२३ रोजी १८/४५ वा.चे मनपा पुणे ब्रीजखाली बस मध्ये चढताना शिवाजीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या मनपा पुणे ब्रीजखाली बस मध्ये प्रवासी म्हणुन चढत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे उजव्या हातातील सोन्याची पाटली १,२०,०००/- रुपये किंमतीची चोरी करुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, काळे ०२०/२५५३६२६३ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५२२/२०२३,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | सादिक मुल्ला,वय ३० वर्षे,रा.आंबेगाव-खुर्द,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/०८/२०२३ रोजी रात्रौ १२/३० वा. ते पहाटे ०५/३० वा.चे दरम्यान स.नं.४३, भोलेनगर,आंबेगाव-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे राहते घरातील कपाटा मध्ये ठेवलेले रोख २,५०,०००/- रुपये यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, आर.के.गोसावी ९८९००९३०१९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**